जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक । वर्ष १ । अंक ५८ । सोमवार, ८ सप्टेंबर २०२५ | मूल्य : २ रु. | पाने : ४

RNI NO - MAHMAR/2022/84210




# गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या...

## पूर्व हवेलीत शांततापूर्ण वातावरणात गणरायाला भावपूर्ण निरोप..

**विशाल कदम**

**लोणी काळभोर, ता.७ :**

निरोप घेतो देवा आम्हा आज्ञा असावी,
चुकले आमुचे कांही त्याची क्षमा असावी..
आभाळ भरले होते तु येताना,
आता डोळे भरुन आलेत तुला पाहुन जाताना..
गणपती बाप्पा मोरया;
पुढच्या वर्षी लवकर या..

अशी आर्त हाक देत पूर्व हवेलीत गणपती बाप्पाला विसर्जन करून भावपूर्ण निरोप दिला.

गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या.., गणपती गेले गावाला चैन पडेना आम्हाला, एक, दोन, तीन, चार गणपतीचा जयजकार.., अशा जयघोषात पूर्व हवेलीतील कदमवाकवस्ती, लोणी काळभोर, थेऊर , कुंजीरवाडी, सोरतापवाडी, उरुळी कांचनसह परिसरातील घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळानी लाडक्या बाप्पाला शनिवारी (ता. ६) भावपूर्ण निरोप दिला.

गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांची शनिवारी सकाळपासूनच लगबग पाहायला मिळाली. गणेश विसर्जन मिरवणुकीच्या आकरा वाजल्यापासूनच उत्साहाला सुरुवात झाली होती. यावेळी नागरिकांसह मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये वेगळा



उत्साह पाहण्यास मिळत होता. बहुतांश भाविकांनी 'बाप्पा' ची मूर्ती ग्रामपंचायतीच्या वतीने तयार केलेल्या कृत्रिम हौदात बाप्पाचे विसर्जन केले. यावेळी सायंकाळी विधिवत पूजा, आरती करत गणरायाला निरोप देण्यात आला.

लोणी काळभोर मधील श्रीमंत अंबरनाथ मित्र मंडळ, क्रांतिवीर व समता समाज मित्र मंडळ, महात्मा गांधी प्रतिष्ठान, जय महाराष्ट्र व जय बजरंग मित्र मंडळ, तिरंगा व गणराज मित्र मंडळ, आदर्श तरुण मंडळ, अखिल रायवाडी मित्र मंडळ, महात्मा फुले व त्रिमूर्ती मित्र मंडळ आदी मंडळांनी भावपूर्ण वातावरणात निरोप दिला. तसेच कदमवाकवस्ती गावाच्या हद्दीतील लोणी स्टेशन येथील श्रीगणेश मित्र मंडळ, मूनलाईट मित्र मंडळ व धर्मवीर संभाजी महाराज मित्र मंडळ, संभाजीनगर येथील अष्टविनायक मित्र मंडळ, कदमवस्ती येथील सम्राट मित्र मंडळ, तर वाकवस्ती येथील छत्रपती शिवाजी महाराज मित्र मंडळ, तर कवडीमाळवाडी गुजर वस्ती येथील विनायक प्रतिष्ठान मंडळाच्या वतीने ही भावपूर्ण वातावरणात निरोप दिला.

**पान ४ वर**

### लोणी स्टेशन चौकात गणपती मंडळांमध्ये टसल

लोणी स्टेशन चौकातील सार्वजनिक गणपती मंडळ व वाकवस्ती येथील गणपती मंडळ या दोन मंडळांमध्ये मागील अनेक वर्षापासून टसल सुरु आहे. दोन्ही मंडळे शनिवारी (ता.६) रात्री पावणे अकरा वाजण्याच्या सुमारास लोणी स्टेशन चौकात समोरासमोर आले. कार्यकर्ते एकमेकांना हातवारे करून आव्हान देत होते. कार्यकर्ते आक्रमक झाले होते तर दोन्ही मंडळांनी डीजेच्या आवाजाची मर्यादा ओलांडली होती. टसल लागुन वाद होऊन प्रकरण कधीही चिघळू शकते? याची पूर्व कल्पना लोणी काळभोर पोलिसांना होती. त्यामुळे पोलिसांचा या चौकात मोठा फौजफाटा उपस्थित होता. पोलीस प्रशासनाने डॉट बारा वाजता डीजे बंद केला. आणि संपूर्ण गणेश विसर्जन सोहळा यशस्वीरीत्या पार पाडला.



# उमाजी नाईकांनी इंग्रजांना सळो की पळो केले

## डॉ. शिवाजी गायकवाड यांचे प्रतिपादन

**लोणी काळभोर, ता. ७ :** उमाजी नाईक यांनी सन १८२६ ते १८३२ या काळात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीला आव्हान दिले. ते रामोशी समाजात जन्माला आले आणि त्यांनी गरिबांना लुटणारे सावकार व जमीनदार यांच्या विरोधात लढा दिला. त्यांनी इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. त्यांनी समाजासाठी केलेले कार्य कौतुकास्पद असून विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घ्यावा. असे प्रतिपादन प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले आहे.

लोणी काळभोर (ता. हवेली) येथील समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालय राजे उमाजी नाईक जयंती रविवारी (ता.७) साजरी करण्यात आली. यावेळी सर्वात प्रथम राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर यांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले. त्यावेळी बोलताना प्रतिपादन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले. यावेळी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. स्नेहा बुरगुल, ग्रंथपाल नीलिमा हेमाडे, प्रा. हजारे, शिक्षकेत्तर कर्मचारी रावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना शिवाजी गायकवाड म्हणाले, राजे उमाजी नाईक यांचा जन्म ७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात भिवडी गावात झाला. ते महाराष्ट्रातील एक आद्य क्रांतिकारक होते. महाराष्ट्रातील पहिल्या स्वातंत्र्य सैनिकापैकी एक असे त्यांना मानले जातात. त्यांनी केलेले कार्य आजही आजारामर आहे. येणाऱ्या काळात प्रत्येक पिढीतील लोकांनी राजे उमाजी नाईक यांचा इतिहास लोकांच्या समोर आणला पाहिजे. असे आवाहन गायकवाड यांनी यावेळी केले.

## संक्षिप्त

### विसर्जनादरम्यान तरुण भीमा नदीत बुडाला

**अक्षय टेमगिरे**

शिक्रापूर, ता. ७ : गणपती विसर्जनाचा उत्साह सुरू असतानाच तळेगाव ढमढेरे (ता. शिरूर) येथील भीमाशेत भागात शनिवारी (दि. ६) सायंकाळी दुर्दैवी घटना घडली. विसर्जनासाठी गेलेला भीमराव लक्ष्मण चेरले (वय ३०, रा. शिर्शी, ता. कंधार, जि. नांदेड, सध्या रा. भीमाशेत) हा तरुण भीमा नदीत बुडाला. मिळालेल्या माहितीनुसार, चेरले विसर्जनावेळी पाण्यात उतरले, मात्र नंतर ते वर आले नाहीत. नदी खोल असून पाण्याचा प्रवाह वेगवान असल्याने ते वाहून गेले असावेत, असा अंदाज वर्तविण्यात येत आहे. घटनेनंतर गावकरी व विसर्जनासाठी उपस्थित मंडळींनी तातडीने शोध सुरू केला. त्याचवेळी पोलिस व स्थानिक बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. रात्री उशिरापर्यंत आणि पहाटेपर्यंत शोधमोहीम राबवण्यात आली; मात्र अद्याप चेरले यांचा शोध लागलेला नाही. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून गणेश विसर्जनाचा उत्साह शोककळेत बदलला आहे.


### श्रुती मराठेची पोस्ट व्हायरल

**पुणे, ता. ८ :** गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान कलावंत ढोल ताशा पथकाला खेदजनक अनुभवाला सामोरं जावं लागलं. मार्केट यार्ड गणेशोत्सव मंडळाने पथकाला आमंत्रित केलं होतं. ठरल्याप्रमाणे पथक सायंकाळी ६ वाजता वादनासाठी सज्ज होते, मात्र टिळक रोडवरील मिरवणूक न सरकल्याने रात्री ९ वाजेपर्यंत पथकाला थांबावं लागलं. अखेर ध्वजवंदन करून वादनास विराम देण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रसंगामुळे चाहत्यांचा हिरमोड झाला. याबाबत कलावंत व्यवस्थापनाने सोशल मीडियावर पोस्ट केली असून अभिनेत्री श्रुती मराठेने ती री-शेअर करत खेद व्यक्त केला. या पोस्टला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून ती व्हायरल होत आहे.

# पुरंदर शैक्षणिक कार्यशाळेत फसवणुकीचा आरोप

**पुणे :** पुरंदर पंचायत समितीच्या शिक्षण विभागातर्फे ३ सप्टेंबर रोजी महात्मा फुले माध्यमिक विद्यालय, शिवरी येथे मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समिती (एसएमसी) अध्यक्षांसाठी शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र या कार्यशाळेच्या आयोजनात गंभीर त्रुटी, गैरव्यवस्था आणि केवळ कागदोपत्री कामकाज केल्याचा प्रकार समोर आला आहे.

शिक्षण विभागाने कार्यशाळेबाबतची माहिती केवळ एक दिवस आधी संबंधितांना कळवली होती. पत्रानुसार सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत कार्यशाळा होणार होती. परंतु, प्रत्यक्षात याच वेळेत शैक्षणिक गुणवत्ता विकास, तंबाखूमुक्त कार्यशाळा आणि नवसाक्षरता कार्यक्रमाचे प्रशिक्षण अशा तीन वेगवेगळ्या कार्यशाळा घेण्यात आल्याचे दाखवण्यात आले. विशेष म्हणजे सकाळी ११ ते दुपारी १ या दोन तासांत तीन वेगवेगळ्या प्रशिक्षण सत्रांचा दावा करण्यात आला. त्यामुळे शिक्षण विभागाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.



**पान ३ वर**

# लोणी काळभोरमध्ये हॉटेल व्यावसायिकाला टोळक्याची मारहाण

## एक जण जखमी तर ६ जणांवर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर, ता. ७ :** पत्नीकडे पाहुन हातवारे करीत असल्याने समजावून सांगण्यासाठी गेलेल्या हॉटेल व्यावसायिकासह त्यांच्या मित्राला एका टोळक्याने शिवीगाळ करून लाकडी दंडुक्याने मारहाण केल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील नांदेपाटील वस्ती परिसरात शुक्रवारी (ता.५) रात्री सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या मारहाणीत एकजण जखमी झाला आहे. तर ६ जणांवर लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




योगेश कांबळे, आकाश बागडे, प्रकाश बागडे, महेश कांबळे, हरिश कांबळे व अनिकेत पारवे (सर्व रा. नांदेपाटील वस्ती, सिद्रामळा, लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी अक्षय गहीणीनाथ मस्तुद (वय २९, रा. नांदेपाटील वस्ती, सिद्रामळा, लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अक्षय मस्तुद हे एक हॉटेल व्यावसायिक असून त्यांचे रामदरा (ता. हवेली) येथे महाराज अमृततुल्य व स्नॅक्स या नावाने हॉटेल आहे. हॉटेल व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नावर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. मस्तुद यांच्या पत्नीकडे पाहुन आरोपी योगेश कांबळे हा हातवारे करीत होता. हे माहित झाल्यानंतर अक्षय आणि त्याचा मित्र कारमधून समजावण्यासाठी गेले होते.

दरम्यान, योगेश कांबळे याला समजावून सांगत असताना, आरोपी कांबळे याचे साथीदार आकाश बागडे, प्रकाश बागडे, महेश कांबळे, हरिश कांबळे व अनिकेत पारवे हे तेथे आले. आरोपींनी मस्तुद व त्यांच्या मित्राला शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपींनी मस्तुद यांना लाकडी दांडके कपाळावर व पाठीत मारून जखमी केले. चारचाकी गाडीच्या मागील दरवाजावर काठी मारून नुकसान केले.

अक्षय मस्तुद याने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपींच्या विरोधात भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १८९ (२), १९१(२), १९०, ३२४(४), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पूजामाळी करीत आहेत.



## संक्षिप्त

### चुकीला माफी नाही; गणेश कोमकर हत्येनंतर पुणे पोलिसांचा इशारा

**पुणे :** शहरात गणेश विसर्जनाची तयारी सुरू असताना पुन्हा एकदा टोळीयुद्धाचा भडका उडाला आहे. गेल्या वर्षी १ सप्टेंबर २०२४ रोजी, नगरसेवक वनराज आंदेकर यांची हत्या झाली होती. आता त्यांच्या हत्येला एक वर्ष पूर्ण झाल्यावर, या खूनाचा बदला घेण्यात आला आहे. वनराज आंदेकर खून प्रकरणातील मुख्य आरोपी गणेश कोमकरच्या १९ वर्षीय मुलाची आयुष कोमकर याची गोळ्या घालून हत्या करण्यात आली आहे. या घटनेनंतर आता पुणे पोलीस सतर्क झाले असून, गुन्हेगारांवर कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. ही घटना काल (५ सप्टेंबर) नाना पेठ परिसरात घडली. या घटनेनंतर पुणे पोलिसांनी गुन्हेगारांना थेट इशारा दिला आहे. या प्रकरणी पुणे गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे बोलताना म्हणाले की, 'या हत्येच्या घटनेला जो कोणी जबाबदार असेल, त्याला कोणत्याही परिस्थितीत सोडणार नाही. मयताला न्याय मिळवून देणे हे आमचे काम आहे. असं आयुक्तांनी यावेळी सांगितलं. पुढे बोलताना त्यांनी, 'आता चुकीला माफी नाही, कोणताही गुन्हा करताना शंभर वेळा विचार करा.' असा इशाराही दिला आहे. घटनेच्या ठिकाणी एका वृत्तवाहिनीशी बोलताना पिंगळे यांनी हा इशारा दिला आहे.

आयुक्तांनी या प्रकरणाचा दोन तासांत उलगडा झाल्याचे सांगितले. 'मयताचे नाव आयुष गणेश कोमकर आहे. तो क्लासवरून घरी परतल्यानंतर त्याच्यावर दोन अज्ञात व्यक्तींनी बिल्डिंगच्या बेसमेंटमध्ये गाडी लावताना त्याच्यावर गोळीबार केला. मयत आयुषचे वडील गणेश कोमकर हे गेल्या वर्षी झालेल्या वनराज आंदेकर खून प्रकरणातील आरोपी आहेत. पोलीस या सगळ्या पैलूंचा विचार करून चौकशी करत आहेत. या प्रकरणात सुरुवातीला दोघांचा सहभाग असल्याचे दिसत असले तरी, यामध्ये आणखी लोक सामील असण्याची शक्यता आहे.' असे त्यांनी यावेळी सांगितले आहे. दरम्यान, आयुक्तांनी नागरिकांना शांतता राखण्याचे आणि कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. पोलीस आतापर्यंत चोखपणे आपलं काम पार पाडत आले आहेत. यापुढेही आम्ही चोखपणे कर्तव्य बजावू. हा गुन्हा कुठल्याही चौकटीत कुणालाही माफ करण्यासारखा नाही.' असं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

### खून का बदला खून! नाना पेठ गोळीबार प्रकरणात पुणे पोलिसांची महत्वाची माहिती

**पुणे :** शहरात पुन्हा एकदा गँगवॉरची धग पेटली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांचा खून एक वर्षांपूर्वी झाला होता. या प्रकरणात गणेश कोमकर मुख्य आरोपी होता. आता त्याच खुनाचा बदला घेताना अज्ञात शूटरांनी गणेश कोमकरचा मुलगा आयुष कोमकर (वय १९) याच्यावर गोळीबार केला. या गोळीबारात त्याला सुमारे दोन गोळ्या लागल्या आणि यात त्याचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. ही घटना काल (५ सप्टेंबर) नाना पेठ परिसरात घडली. या संदर्भात डीसीपी निखिल पिंगळे यांनी माहिती देताना सांगितले की, 'तपासासाठी समर्थ पोलीस स्टेशन, झोन वन व फरासखाना पोलीस स्टेशनच्या डीबी पथकांसह क्राईम ब्रँचच्या सहा टीम्स गुंतवण्यात आल्या आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, आयुष गणेश कोमकरवर दोन अज्ञात व्यक्तींनी गोळीबार केला आणि ते फरार झाले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, हा हल्ला वनराज आंदेकर यांच्या खुनाचा बदला म्हणून करण्यात आला असल्याचे स्पष्ट झाले आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विशेष मोहीम राबवली जात असल्याचं त्यांनी सांगितलं आहे.

### बहिणीला पळवून नेल्याच्या रागातून २७ वर्षीय युवकाचा खून

**दौंड :** शहरात एक धक्कादायक घटना घडली आहे. एका वर्षापूर्वी बहिणीला पळवून नेल्याच्या रागातून केतन डुंबरे (वय २७) या युवकाचा धारदार शस्त्राने आणि दगड-विटांनी मारहाण करून निर्घृण खून केल्याची घटना समोर आली आहे. ही घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. याप्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने दौंड परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, केतन डुंबरे याच्यावर आरोपींनी शुक्रवारी (५ सेप्टेंबर) रात्री अचानक हल्ला चढवला. त्याच्या पाठीत धारदार शस्त्र खुपसण्यात आले आणि त्यानंतर त्याच्यावर दगड व विटांनी वार करण्यात आले. या अमानुष हल्ल्यात केतन गंभीर जखमी झाला आणि घटनास्थळीच त्याचा मृत्यू झाला. ही घटना गणेश विसर्जनाच्या आदल्या दिवशी घडल्याने संपूर्ण शहरात भीती आणि तणावाचं वातावरण पसरलं आहे. याप्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दहशतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या या घटनेमुळे दौंड शहरात संताप व्यक्त केला जात असून, पोलिसांनी आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू केले आहे.

### पुण्यात स्पा सलुनमध्ये अल्पवयीन मुलीचा विनयभंग; आरोपीला अटक

**पुणे :** एका सलूनमध्ये अल्पवयीन तरूणीचा विनयभंग करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना पुण्यातील सिंहगड रोड परिसरामधील नरवीर तानाजी मालुसरे रस्ता परिसरात घडली. उमर युनूस सलमानी (वय १९, रा. वडगाव बु. मूळ गाव बिजनौर, उत्तर प्रदेश) असे आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी संबंधित आरोपीवर गुन्हा दाखल केला असून त्याला अटक करण्यात आली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपी हा बाहेर राज्यातील आहे. चौदा वर्षीय अल्पवयीन मुलगी ३ सप्टेंबरला केसांच्या स्पासाठी सलूनमध्ये गेली होती. स्पामध्ये मुलीचा हेड मसाज चालू असताना आरोपीने तिच्यासोबत अश्लील वर्तन केले. या घटनेमुळे मुलगी घाबरली त्यानंतर तिने लगेच पालकांना घडलेल्या प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर मुलीच्या आईने सिंहगड रस्ता पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून पोलिसांनी गुन्हा दाखल करत आरोपीला ताब्यात घेतले आहे. त्याच्यावर भारतीय न्याय संहिता, तसेच लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायद्यांतर्गत (पोक्सो) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक प्रदीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरू आहे.

### मराठी अभिनेत्याचा मंत्री सरनाईकांना सवाल; नातवासाठी टेस्ला कारवर उठला प्रश्न

**मुंबई :** राज्यातील खड्ड्यांमुळे नागरिकांना मोठा त्रास होत असताना मराठी अभिनेता आस्ताद काळे यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यावर निशाणा साधला आहे. काही दिवसांपूर्वी सरनाईक यांनी आपल्या नातवासाठी टेस्ला कार खरेदी केली होती, ज्यावर सोशल मीडियेत जोरदार चर्चा झाली होती. यावर प्रतिक्रिया देताना आस्ताद काळे म्हणाले, ''नातवासाठी घेतलेल्या टेस्ला कारची किंमत किती? सामान्य नागरिकांच्या जीवाची किंमत किती? एवढा पैसा कुठून आला? तुमच्या नातवाला ही कार चालवायला सांगाल का?'' आस्तादच्या या पोस्टमुळे सोशल मीडियावर मोठी प्रतिक्रिया उमटली असून अनेकांनी त्याच्या रोखठोक प्रश्नांचे कौतुक केले. एक चाहत्याने कमेंट केली, 'बरोबर मुद्दा मांडलास! पण आता उत्तरे मिळणार नाहीत, कारण सगळं आता वॉशिंग मशीनसोबत आहे.' खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांवर प्रशासनाचे दुर्लक्ष नागरिकांच्या नाराजीस कारणीभूत ठरत आहे. आस्तादच्या या पोस्टमुळे हा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे आणि सोशल मीडियावर जोरदार प्रतिक्रिया उमटत आहेत.

# लोणी काळभोरमध्ये व्हॉट्सअ‍ॅप स्टेटसवरून राडा

## अवैध धंदेचालककाकडून महिलेसह तिघांना मारहाण; एक जखमी, तिघांवर गुन्हा

**लोणी काळभोर, ता. ६ :** मोबाईलच्या व्हाट्स अ‍ॅप स्टेटस विरोधात ठेवल्याचा राग मनात धरून अवैध धंदेचालकाने त्याच्या दोन साथीदारांच्या मदतीने महिलेसह तिघांना शिवीगाळ करून बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील सिद्राम मळा परिसरात असलेल्या म्हस्कोबा मंदिरा समोरील रस्त्यावर शुक्रवारी (ता.५) रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या मारहाणीत एक जण जखमी झाला आहे. तर तीन जणांच्या विरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




आकाश बाळू बागडे (वय -२०), कल्पना बाळू बागडे व योगेश नागनाथ कांबळे या तिघांना मारहाण झाली आहे. यातील आकाश याच्या डोक्याला मार लागून जखमी झाला आहे. तर शंकर तानाजी धायगुडे (वय २८ ),नागेश चंद्रकांत वाघमारे (वय २८), अक्षय गहिनीनाथ मस्तुद (वय २९, सर्व रा. सिद्राममळा, लोणी काळभोर, ता. हवेली) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आकाश बागडे हा सिद्राम मळा परिसरात कुटुंबासोबत राहतो. आकाश हा रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो. आकाश व त्याचा मित्र योगेश कांबळे हे म्हस्कोबा मंदिरा समोरील रस्त्यावर शुक्रवारी (ता.५) रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास थांबले होते. तेव्हा त्या ठिकाणी शंकर धायगुडे आला. त्याने आकाशला बोलावले. आणि मोबाईलमध्ये ठेवलेल्या स्टेटसचा राग मनात धरुन आकाशबरोबर विनाकारण वाद घालण्यास सुरवात केली.

दरम्यान, शंकर सोबत असलेला त्याचा साथीदार अक्षय मस्तुद यांने तेथे पडलेले लाकडी दांडके उचलुन आकाशच्या डोक्यात मारले. त्यानंतर शंकर घायगुडे, नागेश वाघमारे यांनी सर्वांनी मिळुन आकाश व त्यांचा मित्र योगेश कांबळे यांना लाथाबुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली. त्यावेळी फिर्यादी यांची आई कल्पना या भांडणे सोडवण्यासाठी मध्यस्ती करू लागल्या. तेव्हा नागेश वाघमारे याने त्यांनादेखील हाताने मारहाण केली.

या मारहाणीत आकाश बागडे यांच्या डोक्याला दुखापत झाली आहे. याप्रकरणी आकाश बागडे यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार वरील तीनही आरोपींच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरिक्षक अंकुश बोराटे करीत आहेत.

### अवैध धंदेचालकाची मुजोरी

शंकर धायगुडे हा अवैध धंदेचालक म्हणून कुप्रसिद्ध आहे. त्याच्यावर याअगोदरही लोणी काळभोर पोलीस ठाण्यात शासकीय कर्मचाऱ्याला कर्तव्य बजावताना अडथळा निर्माण करणे, दंगल घडवून आणण्याच्या प्रयत्न, बेकायदेशीर जमाव जमवणे, आत्महत्येचा प्रयत्न करणे असे विविध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. धायगुडे याने आताही महिलेसह तिघांना शिवीगाळ करून मारहाण केली आहे. त्यामुळे या अवैध धंदेचालकाची मुजोरी कधी थांबणार? अशी चर्चा नागरिकांमध्ये जोरदार रंगली आहे.

# पुण्यात डीजेवर गाणं लावून हत्या

## 'टपका रे टपका...' गाण्यावरून तीन जणांच्या जीवाला धोका?

**पुणे, ता. ७ :** पुण्यातील नाना पेठ परिसरात शुक्रवारी (५ सप्टेंबर २०२५) सायंकाळी झालेल्या टोळीयुद्धाने शहर पुन्हा एकदा हादरले आहे. गेल्या वर्षी याच परिसरात माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची हत्या झाली होती. या हत्येला एक वर्ष पूर्ण होताच, याचा बदल घेण्यात आला आहे. वनराज आंदेकर खून प्रकरणातील मुख्य आरोपी गणेश कोमकरच्या मुलाची आयुष उर्फ गोविंद गणेश कोमकर (वय १९) याची अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या झाडून हत्या केली आहे. या घटनेने पुणे शहरात खळबळ उडाली असून, पोलिसांनी तातडीने याचा तपास सुरू केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, आयुष कोमकर हा आपल्या ट्यूशन क्लासमधून घरी आला असताना, त्याच्या इमारतीच्या बेसमेंटमध्ये दोन अज्ञात हल्लेखोरांनी त्याच्यावर गोळीबार केला. हल्लेखोरांनी एकूण अकरा गोळ्या झाडल्या, त्यापैकी तीन गोळ्या आयुषला लागल्या. यात आयुष्य गंभीर जखमी झाला त्याला तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु डॉक्टरांनी त्याला उपचारापूर्वीच मृत घोषित केले.

आयुषचे वडील गणेश कोमकर हा वनराज आंदेकर यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी असून, सध्या तो तुरुंगात आहे. आयुष हा वनराज आंदेकर यांचा भाचा होता. पोलिसांना संशय आहे की, ही हत्या जुन्या वैमनस्यातून आणि 'खून का बदला खून' या सूडबुद्धीने झाली असावी. घटनेनंत आता आंदेकर आणि कोमकर या दोन गटांमधील संघर्ष पुन्हा तीव्र होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, जेव्हा आयुषची हत्या करण्यात आली तेव्हा जवळच्या गणेश मंडळाच्या डीजेवर 'टपका रे टपका, एक ओर टपका' हे गाणं वाजवण्यात आले होते. हे गाणं सुरु असतानाचं ही हत्या झाल्याने याचा घटनेशी संबंध जोडण्यात येत आहे. स्थानिकांमध्ये याबाबत चर्चा आहे की, 'हल्लेखोरांनी डीजेवर गाणे लावत संकेत दिले आणि त्यानंतर ही हत्या केली. गाण्याचे बोल 'टपका रे टपका, एक ओर टपका, चार में से एक गया, तीन का ये मटका' असे असल्याने आणखी तीन खून होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, पोलिसांनी याबाबत कोणतीही अधिकृत पुष्टी केलेली नाही.

या घटनेनंतर पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेचे उपायुक्त निखिल पिंगळे यांनी सांगितले की, आरोपींचा शोध घेण्यासाठी सहा पथके तैनात करण्यात आली आहेत. तसेच, चुकीला माफी नाही. मयताला न्याय मिळवून देणे हे आमचे काम आहे. कोणताही गुन्हा करण्यापूर्वी शंभर वेळा विचार करा. असा इशारा त्यांनी दिला आहे. या प्रकरणी पोलिसांनी तपास तीव्र केला असून, सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने आरोपींचा शोध घेतला जात आहे.

### येरवडा येथील आयटी पार्कमध्ये 'अग्नितांडव'

**पुणे, ता. ७ :** पुणे शहराच्या येरवडा भागात असलेल्या कॉमरझोन आयटी पार्कच्या सहाव्या मजल्यावर आज सकाळी (७:४५ वाजता) भीषण आग लागल्याची घटना घडली. ही माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या आणि त्यांनी अवघ्या अर्ध्या तासात आगीवर नियंत्रण मिळवले. आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही, ही सर्वात दिलासादायक बाब आहे. मात्र, आग विझवण्याच्या प्रयत्नात नायडू अग्निशमन केंद्रातील एक फायरमन सोन्यादादा नायडू यांच्या पायाला दुखापत झाली असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

येरवडा, खराडी, नायडू आणि धानोरी अग्निशमन केंद्रांच्या जवानांनी तात्काळ बचावकार्य सुरू केले. त्यांनी होजपाईप्स आणि आयटी पार्कमध्ये असलेल्या स्थायी अग्निशमन यंत्रणेचा प्रभावी वापर करून आग विझवली. त्यांच्या या तत्परतेमुळे आग इतर मजल्यांवर पसरली नाही आणि शेकडो कर्मचाऱ्यांचे प्राण वाचले.

या आगीमुळे कार्यालयातील फर्निचर, कागदपत्रे आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे जळून खाक झाली आहेत. पोलिसांनी या घटनेची नोंद घेतली असून, आगीचे कारण अद्याप समोर आलेले नाही.

# प्रा. डॉ. बाळकृष्ण ळळीत यांची सेवापूर्ती

## अध्यापन, संशोधन व साहित्यलेखन कार्य भावी पिढ्यांसाठी आदर्श – नंदकुमार निकम

**योगेश मारणे**

**शिरूर, ता. ७ :** ''प्रा. डॉ.बाळकृष्ण ळळीत यांनी अध्यापन, संशोधन व साहित्यलेखन क्षेत्रात केलेले कार्य भावी पिढ्यांसाठी कायमचे आदर्शवत राहील,'' असे प्रतिपादन शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव नंदकुमार निकम यांनी केले.

चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरूर येथील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. बाळकृष्ण ळळीत यांच्या सेवापूर्ती सदिच्छा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विविध संस्था, पदाधिकारी, प्राध्यापक, आजी-माजी विद्यार्थी यांच्या वतीने डॉ. ळळीत यांचा सत्कार करण्यात आला.

नंदकुमार निकम पुढे म्हणाले की, ''बोरा महाविद्यालयात तब्बल ३३ वर्षे ३ महिने प्रा.ळळीत यांनी मराठी विषयाचे अध्यापन केले. अध्यापनकुशल, व्यासंगी व उपक्रमशील प्राध्यापक म्हणून त्यांनी ख्याती मिळवली. लोकसाहित्य, दशावतार, लोककला, बोलीभाषा या विषयांवर त्यांनी अभ्यासपूर्ण संशोधन केले. निवृत्ती हा केवळ एक टप्पा असून पुढेही साहित्यलेखन व संशोधन क्षेत्रात ते महत्त्वपूर्ण योगदान देतील,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आपल्या भावना व्यक्त करताना प्रा. डॉ.बाळकृष्ण ळळीत म्हणाले की, ''गेल्या ३३ वर्षांत हजारो विद्यार्थ्यांना मराठी भाषा व साहित्य शिकवण्याचे भाग्य लाभले. मी जेवढे जाणत होतो तेवढे विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न केला. मराठी भाषेची सेवा करता आली याचे समाधान आहे. या प्रवासात शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, सहकारी प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले, याबद्दल मी सदैव कृतज्ञ आहे,'' असे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ.के.सी. मोहिते, उपप्राचार्य प्रा.हरिदास जाधव, डॉ.सुधाकर शेलार, डॉ.राजाभाऊ भैलुमे, डॉ.ईश्वर पवार, डॉ.किसन पिसाळ, डॉ.दत्ता कारंडे, प्रा.सतीश धुमाळ, डॉ.अतुल जेठे, प्रा.सुनील कवादे, डॉ.रेणुका गायकवाड, विश्वास दसगुडे आदींची भाषणे झाली.

यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.संदीप सांगळे, विद्या ळळीत, प्रा.चंद्रकांत धापटे, डॉ. सुश्रुत ळळीत, डॉ.अश्विनी ळळीत, संहिता ळळीत, प्रा.शशिकांत जाधव, प्रा.व्ही. एच.पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.क्रांती पैठणकर यांनी केले.

# अखेर भूमी अभिलेखचे तत्कालीन जिल्हा अधीक्षक सूर्यकांत मोरे निलंबित

**संदीप बोडके**

पुणे, ता. ७ : 'पुणे प्राईम न्यूज'च्या बातम्यांची दखल घेत तसेच चौकशी समितीच्या अहवालानंतर शासनाने पुण्यातील तत्कालीन जिल्हा अधीक्षक व सध्या उपसंचालक भूमी अभिलेख विभागाचे पुणे (एकत्रीकरण) सूर्यकांत मोरे यांना अखेर निलंबित केले आहे. भूमी अभिलेख विभागातील मोठा अधिकारी शासनाने निलंबित केल्याने खळबळ उडाली आहे.

त्यांच्या पुणे जिल्हा अधिक्षक पदावरील कार्यकाळात झालेला अनियमित कारभाराचा "पंचनामा" पुणे प्राईम न्यूजने वेळोवेळी प्रकाशित केला होता. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने त्यांना निलंबनाचा झटका देऊन भूमी अभिलेख मधील कारभार स्वच्छ ठेवण्याच्या दिशेने काही पावले उचलल्याचे बोलले जाते. शुक्रवारी ५ सप्टेंबरला सायंकाळी उशिरा मोरे यांच्या निलंबनाचा आदेश शासनाने जारी केला आहे.

काही महिन्यांपूर्वी मोजणी विभागाचा हवेली व पुणे जिल्हा कार्यालयाच्या अनियमित कारभाराचे



सूर्यकांत मोरे

वृत्तांकन पुणे प्राईम न्यूज नेटवर्क ने केले होते. त्यामुळे भूमी अभिलेख विभागातील भ्रष्टाचार समोर आल्याने शासनाने हवेली उपअधीक्षक कार्यालय व पुणे जिल्हा अधीक्षक कार्यालयाची तपासणी शासनाने नियुक्त केलेल्या समिती मार्फत केली होती. यामध्ये हवेलीचे तत्कालीन उपअधिक्षक अमरसिंह पाटील यांच्यावर ठपका ठेवण्यात आला होता. तसेच काही प्रकरणांमध्ये त्यांच्यावर पोलिस स्टेशनला गुन्हे दाखल झाले होते.

त्यामुळे त्यांची गांभीर्याने दखल घेत शासनाने पाटील यांना यापूर्वीच निलंबित केले होते. हवेलीचे तत्कालीन उपअधिक्षक पाटील यांचे निलंबन झाल्यानंतर जिल्हा अधीक्षक सूर्यकांत मोरे यांच्यावर कारवाई होणार का ? याकडे नागरिकांचे लक्ष लागले होते. अखेर गंभीर अनियमित कारभाराची दखल शासनाने घेत सूर्यकांत मोरे यांना निलंबनाचा रस्ता दाखवला आहे. त्याअनुषंगाने त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशीची कार्यवाही केली आहे. पुणे प्राईम न्यूजने नेहमीच भ्रष्टाचार आणि अनियमित कारभारावर बोट ठेवत त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. समाजात पारदर्शकता यावी, नागरिकांचा विश्वास टिकून राहावा यासाठी 'पुणे प्राईम न्यूज' सतत प्रयत्नशील आहे. भूमी अभिलेख विभागातील भ्रष्टाचाराचे धागेदोरे उलगडून दाखवले नसते, तर अनेक गोष्टी काळाच्या ओघात दडपल्या गेल्या असत्या. 'पुणे प्राईम न्यूज'नेच याबाबत सखोल वृत्तांकन केले आणि शासनाला कारवाई करण्यास भाग पाडले. नागरिकांसाठी नवे माध्यम उभे करून सत्य समोर आणणे हीच पुणे प्राईम न्यूजची ताकद ठरली आहे. अन्याय आणि गैरव्यवहाराच्या विरोधात सातत्याने आवाज उठवत, समाजाला दिशा दाखवण्याचे काम या पुणे प्राईम न्यूजने केले आहे. त्यामुळे प्रशासनावर दबाव निर्माण झाला असून, याच कामगिरीमुळे भूमी अभिलेख विभागातील भ्रष्टाचार उघडकीस आला आहे.

# गणेश विसर्जनादिवशी पुण्यात भीषण अपघात

**पुणे, ता. ७ :** पुणे जिल्ह्यातील नीरा शहरातील अहिल्यानगर-सातारा महामार्गावर शनिवारी (६ सप्टेंबर २०२५) सायंकाळी ४:४५ वाजता एक भीषण अपघात घडला. या अपघातात विजय कुवरलाल साखरे (रा. बोपर्डी, नागपूर, सध्या वाई एम.आय.डी.सी.) यांचा मृत्यू झाला आहे. विजय हे आपल्या पत्नी लता साखरे यांच्यासह होंडा शाईन या दुचाकीवर वरवंड (ता. दौंड) येथील आश्रमशाळेत आपल्या १२ वर्षीय मुलाला भेटण्यासाठी गेले होते.

परतताना त्यांनी एका ट्रकला डाव्या बाजूने ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. यावेळी दुचाकी घसरल्याने विजय ट्रकच्या चाकाखाली सापडले, तर लता रस्त्यावर पडल्या. प्रत्यक्षदर्शींच्या मते, विजय यांनी हेल्मेट घातले होते, पण अपघातात हेल्मेट निघून पडले. या अपघातात विजय यांना प्रचंड रक्तस्त्राव झाल्याने त्यांना तातडीने जवळच्या खाजगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, त्यांच्या गंभीर अवस्थेमुळे त्यांना लोणंद येथे हलवण्यात आले. दुर्दैवाने, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

नीरा पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन दुचाकी आणि ट्रक ताब्यात घेतले असून, तपास सुरू केला आहे. विजय हे गेल्या दोन महिन्यांपासून वाई एम.आय.डी.सी.मध्ये कामगार म्हणून काम करत होते. दरम्यान, या भयानक अपघातामुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

# इंदापूर बाजार समितीत डाळिंबाला उच्चांकी दर

## प्रति किलो ५०१ रुपये; शेतकरी हरिश्चंद्र साळुंखे यांच्या डाळिंबाला मिळाला विक्रमी भाव

**आदित्य बोराटे**

**इंदापूर, ता. ७ :** इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार इंदापूर डाळींब मार्केटमध्ये, शुक्रवार (दि.५ ) सप्टेंबर रोजी डाळींबाची प्रति किलो ५०१ रुपये या रेकॉर्डब्रेक दराने विक्री झाली, अशी माहिती बाजार समितीचे सभापती तुषार जाधव, उपसभापती मनोहर ढुके व माजी सभापती आप्पासाहेब जगदाळे यांनी दिली.



बाजार समितीच्या राजाभाऊ गवळी फ्रुट कंपनी या आडतीवर हरिश्चंद्र साळुंखे (रा. यावली, ता. मोहोळ) या शेतकऱ्याचे डाळींब प्रति किलो ९५ ते ५०१ रुपये उच्चांकी दराने खरेदी झालेली आहे. इंदापूर बाजार समितीत डाळिंब मार्केट सुरू झाल्यापासून प्रति किलोला हा पहिल्यांदाच उच्चांकी दर शेतकऱ्याला मिळाला आहे.

डाळींब मार्केटमध्ये चांगला दर मिळत असल्याने सोलापूर जिल्हा व इतर जिल्ह्यातील डाळिंब उत्पादक शेतकरी इंदापूर बाजार समितीच्या मार्केटमध्ये, विश्वास पूर्व आपला शेतमाल विक्रीसाठी आणत आहेत, बाजार समितीचे योग्य नियोजन आणि संचालक मंडळाचे अधिक लक्ष असल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालास मोठा दर मिळू लागला आहे.

याच समितीने मुख्य बाजार इंदापूर येथे डाळींब, पेरु व इतर फळे-भाजीपाला शेतकरी, व्यापारी खरेदीदार वर्गाकरीता लाईट, पाणी, आवक लोडींग अनलोडींग, पॅकिंगकरीता सेलहॉल, पार्किंगसाठी प्रशस्त मोकळी जागा, बंदिस्त वॉलकंपाऊंड, टॉयलेट व राहण्याची व्यवस्था केलेली आहे.

बाजार समितीने उपलब्ध केलेल्या सर्व सोयी-सुविधा, विविध योजना व उपक्रमांचा शेतकरी बांधव व व्यापारी / खरेदीदार यांनी लाभ घ्यावा असे आवाहन इंदापूर बाजार समितीचे सभापती तुषार जाधव, उपसभापती मनोहर ढुके, माजी सभापती आप्पासाहेब जगदाळे यांनी केलेले आहे.

यावेळी संचालक माजी आमदार यशवंत माने, विलासराव माने, दत्तात्रय फडतरे, मधुकर भरणे, रोहित मोहोळकर, संग्रामसिंह निंबाळकर, संदिप पाटील, रुपालीताई संतोष वाबळे, मंगलताई गणेशकुमार झगडे, आबा देवकाते, संतोष गायकवाड, अनिल बागल, दशरथ पोळ, रोनक बोरा, सुभाष दिवसे, रवि चव्हाणउपस्थितहोते.

# अजितदादांनी महिला अधिकाऱ्याला झापलं

## बाबा जगतापचा खळबळजनक व्हिडीओ समोर!

**सागर घरत**

**करमाळा, ता. ७ :** बाबा जगताप या कार्यकर्त्याने अजित पवार यांना कॉल करून अंजना कृष्णा यांच्याशी बोलण्याची विनंती केली होती. आता याच बाबा जगतापचा एक व्हिडीओ समोर आला आहे. या व्हिडीओला पाहून त्याच्यावर कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे. अवैध मुरूम उत्खनन थांबवण्यासाठी आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा गेल्यानंतर त्यांना फोन कॉलच्या माध्यमातून कारवाई थांबवण्याचा आदेश दिल्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर सडकून टीका केली जात आहे.

अंजना कृष्णा आणि अजित पवार यांच्यातील संभाषणाचा व्हिडीओ व्हायरल झाला असून हे प्रकरण तापल्यामुळे अजित पवार यांनी उत्खननावेळी तणाव वाढू नये म्हणून मी काळजी घेत होतो, असे म्हणत सारवासारव करण्याचा प्रयत्न केला आहे. दरम्यान, अजित पवार आणि पोलीस अधिकारी अंजना कृष्णा यांचे संभाषण घडवून आणणारा अजितदादांच्या पक्षाच्या कार्यकर्त्याचा आता एक व्हिडीओ समोर आला आहे. या व्हिडीओमुळे आता या कार्यकर्त्याच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

**अजितदादांनी आयपीएस अधिकाऱ्याला काय आदेश दिला होता?**

मिळालेल्या माहितीनुसार, बाबा जगताप हा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाचा माडा तालुका अध्यक्ष आहे. कुर्डू गावामध्ये कथित अवैध पद्धतीने मुरूम उपसा चालू असताना अंजना कृष्णा यांनी रोखल्यानंतर याच बाबा जगताप याने अजित पवार यांना कॉल करून त्यांचे अंजना कृष्णा यांच्याशी संभाषण घडवून आणले होते. त्यानंतर अजित पवार यांनी अंजना कृष्णा यांना चांगलेच दरडावून सांगत सध्या सुरू असलेली कारवाई थांबवा असा आदेश फोन कॉलद्वारे दिला होता.

व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून हा आदेश द्या, असे म्हटल्यानंतर अजित पवार यांनी अंजना कृष्णा यांना चांगलेच सुनावले होते. मी राज्याचा उपमुख्यमंत्री बोलतोय. मी तुमच्यावर कारवाई करेन, असेही यावेळी अजित वार यांनी अंजना कृष्णा यांना खडसावून सांगितले होते.

**नेमका काय प्रकार समोर आला आहे?**

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा यांच्यातील मोबाईल संभाषणचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. या प्रकरणावरून अजित पवारांना जाहीर माफी मागावी लागली आहे. या प्रकरणाच्या केंद्रस्थानी असलेल्या बाबा जगताप या राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकाऱ्याच्या नव्या व्हायरल व्हिडिओमुळे आणखी अडचणी वाढल्या आहेत. अजित पवारांना फोन लावून देणाऱ्या तालुका अध्यक्ष बाबा जगताप याचा कथितपणे नशा करणारा एक व्हीडिओ व्हायरल झाला आहे.

या व्हिडीओमध्ये तो एका खुर्चीवर बसल्याचे दिसत आहे. त्याच्या समोर एक टेबल आहे. खुर्चीवर बसून तो कशाचीतरी नशा करताना दिसत आहे. विशेष म्हणजे नशा करताना वापरत असलेले साधनही तो व्हिडीओत दाखवताना दिसत आहे. बाबा जगतापचा हा व्हिडीओ समोर आल्यामुळे आता त्याच्याविरोधात कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे. पोलीस आता या प्रकरणी नेमकी कोणती कारवाई करणार? हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे.

# कुंजीरवाडीत लॉजवर परित्यक्ता महिलेवर बलात्कार

## पीडितेला एकांतात बोलण्याचा बहाणा करून आरोपीने केला अत्याचार; लोणी काळभोर पोलिसांकडून तपास सुरू

**लोणी काळभोर, ता.७ :** नवऱ्या पासून अलिप्त राहत असलेल्या परित्यक्ता महिलेशी शादी डॉट कॉम साईटवर ओळख केली. त्यानंतर एकांतात बोलण्याचा बहाणा करून भेटण्यासाठी बोलावून तिच्यावर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना कुंजीरवाडी (ता. हवेली) येथील एका लॉजवर २४ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली आहे. तसेच वारंवार शारिरीक संबंध ठेवण्यासाठी आरोपीने महिलेला धमकी दिल्याचाही प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. तर लोणी काळभोर पोलीस ठाण्यात एकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



चंद्रकांत दिनकर थोरात (वय ३०, चाकण, पुणे) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी एका २५ वर्षीय पिडीतेने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिडीता या विवाहित असून त्या पतीपासून अलिप्त राहत आहेत. पिडीता व त्यांच्या दोन लहान मुलींसोबत यवत (ता. दौंड) येथे राहतात. कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी फिर्यादी खाजगी नोकरी करतात. पतीपासून फारकत घेवून दुसरे लग्न करण्याचा विचार त्यांनी केला होता. पिडीता या शादी डॉट कॉम साईटवर योग्य जोडीदार शोधत होत्या. तेव्हा त्यांची आरोपी चंद्रकांत थोरात यांच्याशी ओळख झाली. त्यानंतर आरोपीने पिडीतेचा विश्वास संपादन केला. दोघेही एकमेकांना फोनवर बोलु लागले. पहिल्या पतीपासून फारकत घेतल्यानंतर लग्न करणार असे पिडीता यांनी थोरात यांना सांगितले होते.

दरम्यान, फोनवर बोलत असताना एक दिवस चंद्रकांत थोरात याने पिडीता यांना बोलण्याचा बहाणा करून उरुळी कांचन (ता. हवेली) येथे भेटायला बोलावले. ठरल्याप्रमाणे दोघेही २४ ऑगस्टला दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास रोडवर भेटले. रोडवर काहीही एक बोलता येत नाही. आपण एकांतात जावून बोलुया. असे म्हणून थोरात याने पिडीता यांना त्याच्या शाईन गाडीवर बसविले. दोघे दुचाकीवर बसून पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून पुण्याच्या दिशेने निघाले. कुंजीरवाडीतील एका लॉजवर गेले.

गप्पा मारत असताना आरोपी हा पिडीतेशी शारिरीक जवळीक करु लागला. त्यानंतर चंद्रकांत थोरात याने पिडीतेकडे थेट शारिरीक सुखाची मागणी केली. यावेळी पिडीतेने लग्नानंतर आपण शारिरीक संबंध ठेवू असे सांगितले. त्यावेळी आरोपीने काही न ऐकता पिडीतेसोबत जबरदस्तीने शारिरीक संबंध ठेवले. त्यानंतर आरोपीने पिडीतेला वेळो वेळी फोन करून भेटण्यास बोलावू लागला व शारिरीक सुखाची मागणी केली आहे.

याप्रकरणी २५ वर्षीय पिडीतेने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपी चंद्रकांत थोरात याच्यावर भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ६४, ३५१ (२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के करीत आहेत.

# भाजपा पुणे-सोलापूर मंडल सरचिटणीसपदी नवीन नियुक्ती

## लोणी काळभोरचे कमलेश काळभोर व उरुळी कांचन येथील सुनील तुपे यांच्यावर जबाबदारी

**लोणी काळभोर, ता. ७ :** भारतीय जनता पार्टी हवेली सोलापूर रोड मंडल कार्यकारिणीच्या सरचिटणीसपदी लोणी काळभोर (ता. हवेली) येथील कमलेश दत्तात्रय काळभोर व उरुळी कांचन येथील सुनिल अंकुश तुपे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीमुळे पूर्व हवेलीत आनंदाचे वातावरण तयार झाले आहे. तर कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष साजरा केला आहे.

सोरतापवाडी फाटा (ता.हवेली) येथील चोरघे कार्यालयात भाजपचा पदनियुक्ती समारंभ शुक्रवारी (ता.५) संपन्न झाला. यावेळी भारतीय जनता पार्टीच्या वतीने हवेली सोलापूर रोड मंडल कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना निवडीचे पत्र देऊन सन्मानित केले. या कार्यक्रमाला पिडीसी बँकेचे संचालक तथा भाजपचे पुणे (उत्तर) जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद, प्रदेश क्रीडा आघाडी अध्यक्ष संदीप भोंडवे, जिल्हा उपाध्यक्ष सुदर्शन चौधरी, प्रवीण



कमलेश काळभोर



सुनिल तुपे

काळभोर, महिला मोर्चा अध्यक्ष पुनम चौधरी, गणेश चौधरी, श्याम गावडे व भाजपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**१) पुणे जिल्हा (उत्तर) हवेली-सोलापूर रोड मंडल कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : अध्यक्ष :** गणेश बाळासाहेब चौधरी, **सरचिटणीस :** कमलेश दत्तात्रय काळभोर, सुनिल अंकुश तुपे, **उपाध्यक्ष :** नामदेव म्हातु जवळकर, खुशाल बापुसो कुंजीर, सुभाष आनंदा कुंजीर, दिपक मारूती कुंजीर, मनिष मारूती काळभोर, काळुराम हिरामण कुरकुंडे, नितीन पोपट टिळेकर, **चिटणीस :** मुरलीधर गजानन साठे, मोहन रामचंद्र खेडेकर, मयुर सुभाष कुंजीर, किरण सुर्यकांत जगताप, राजेंद्र अंबरनाथ शिंदे, काजल लक्ष्मण खोमणे, **कोषाध्यक्ष :** अभिजीत रमेश महाडीक

**२) मोर्चा कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : युवा :** मंगेश अशोक कानकाटे, **महिला :** निर्मला धनंजय धुमाळ, **किसान :** तुषार उत्तम टिळेकर, **अल्पसंख्यांक :** अश्पाक मुलाणी, **अनुसूचित जमाती :** आबासाहेब चव्हाण, **अनुसूचित जाती :** अंकुश कांबळे

**३) आघाडी कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : पंचायत राज :** हरेश शामराव गोठे, **सोशल मिडिया :** प्रशांत मारुती भोंडवे, **सहकार :** कृषीराज दत्तात्रय चौधरी, **क्रीडा :** शिवाजी मुरलीधर महाडिक, **अध्यात्मिक :** ह.भ.प. शरद खेडेकर, **कायदा :** ॲड. भाऊसाहेब बबन कांचन, **व्यापार :** विनायक बाळप, **आयटीसेल :** युवराज जराड, **भटके विमुक्त :** सतीश जयवंत केसकर, **उद्योग :** विश्वनाथ रुपनवर, **पदवीधर :** ॲड. सुमित दिलीप वनारसे, **कामगार :** अतुल सुदाम मोरे, **आयुष्यमान भारत :** गुरुनाथ हनुमंत मचाले, **उत्तर भारतीय :** गुरमीत हरदत्तसिंग बडगुजर

**४) उपाध्यक्ष : भटके विमुक्त उपाध्यक्ष :** अशोक कृष्णा शिंदे, **पदवीधर उपाध्यक्ष :** मयूर अरुण खेडेकर, **कायदा उपाध्यक्ष :** गणेश गोरख घाडगे

**५) शहराध्यक्ष : लोणी काळभोर :** संकेत बबन काळभोर, **कदमवाकवस्ती :** ओंकार अशोक काळभोर, **उरुळी कांचन :** अक्षय उर्फ बंटी लक्ष्मण कांचन

**६) लोणी काळभोर शहर : उपाध्यक्ष :** सौरभ कालिदास काळभोर, जयेश खेतमाळीस, **सरचिटणीस :** अजिंक्य दुगाणे, **युवा मोर्चा :** विराज चिले, **सांस्कृतिक आघाडी :** प्रणव ताटे, **विद्यार्थी :** अक्षय चंद्रशेखरकाळभोर

## पुरंदर शैक्षणिक कार्यशाळेत फसवणुकीचा आरोप

**पान १ वरून**

पुरंदर तालुक्यातील २१८ शाळांसाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये २१८ मुख्याध्यापक व २१८ शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष किंवा सदस्य म्हणजेच एकूण ४३६ जणांना प्रशिक्षण देण्यात आल्याचा दावा करण्यात आला. मात्र प्रत्यक्ष उपस्थिती फारच कमी होती. केवळ ६ शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रत्यक्षात कार्यशाळेत आले, तर अनेक शिक्षकही अनुपस्थित होते. तरीही अनुपस्थित व्यक्तींना उपस्थित दाखवत हजेरीपत्रकात खोटी नोंद करण्यात आल्याचे समोर आले आहे. या प्रकारामुळे कार्यशाळा केवळ कागदोपत्री दाखवण्यासाठी आयोजित करण्यात आली होती का, असा प्रश्न स्थानिकांमध्ये उपस्थित केला जात आहे. शिक्षण क्षेत्रात पारदर्शकता आणि जबाबदारीचा अभाव असल्याने याचा थेट फटका गुणवत्तापूर्ण शिक्षणाला बसत असल्याची टीका केली जात आहे.






Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222)

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित के ले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित के ले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# लोणी काळभोर, कदमवाकवस्ती येथील गणपती मंडळांमध्ये टसल...!

## आधी हमरातुमरी, मग नाणेफेक, नंतर वाढला डीजेचा आवाज; पण पोलिसांची एन्ट्री होताच नमला आवाज...




**लोणी काळभोर, ता. ७ :** लाडक्या बाप्पाचे विसर्जन प्रत्येक मंडळ आपापल्या पद्धतीने व वेळेनुसार करते. गणपती विसर्जनाची मिरवणूक मंडळे मोठ्या थाटामाटात काढतात. या दरम्यान काही मंडळांनी पारंपारिक वाद्यांना पसंती दिली आहे. तर काहींनी डीजे, बँड व विद्युत रोषणाईला पसंती दिली आहे. परंतु, लोणी काळभोर, कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथे गणरायाला निरोप देताना गणपती मंडळांमध्ये टसल लागल्याचे चित्र दिसून आले आहे. त्याचबरोबर मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये हमरातुमरीसह यावर्षी कुणाचा गणपती पुढे जाईल? यासाठी नाणेफेकसुद्धा झाल्याचा प्रकार पुढे आला आहे. मिरवणुकीदरम्यान डीजेचा आवाज मर्यादेपेक्षा वाढला. पण लोणी काळभोर पोलिसांची एन्ट्री होताच, पुन्हा आवाज नरमला असल्याचे सर्वांना पहायला मिळाले आहे.

लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ९९ सार्वजनिक मंडळे आहेत. काल शुक्रवार (ता.५) पर्यंत कदमवाकवस्ती, लोणी काळभोर, थेऊर, कुंजीरवाडी, आळंदी म्हातोबाची व तरडे येथील ८० हून अधिक मंडळांनी गणपती बाप्पाचे विसर्जन केले आहे. यावेळी मंडळांनी ढोल ताशा पथक, डीजे, बँड व विद्युत रोषणाईचा वापर केला आहे. कदमवाकवस्ती येथील कवडीपाट, संभाजीनगर व इंदिरानगर तर लोणी काळभोर येथील खोकलाई चौकाजवळ सार्वजनिक मंडळांची डीजेचा आवाज वाढविण्यावरून टसल लागली होती.

संभाजी नगर येथील दोन गणपती मंडळे शुक्रवारी (ता.५) रात्री आठ वाजण्याच्या सुमारास समोरासमोर आले होते. दोन्ही मंडळांनी तब्बल एक तास एकाच जागेवर डीजेचा दणदणाट सुरु ठेवला होता. मंडळांचे कार्यकर्ते तू तू मै मै करू लागले होते. कोणीही गणपती पुढे घेण्यास तयार नव्हते. यामध्ये डीजेचा आवाज मर्यादेपेक्षा जास्त वाढला. तितक्यात लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे व त्यांच्या सहकाऱ्यांची एन्ट्री झाली. पोलिसांनी डीजे वाजविणाऱ्याला तंबी दिली. आणि दोन्ही मंडळांमध्ये समझोता घडवून आणला. यावेळी नाणेफेक झाली. त्यानंतर यावर्षी कुणाचा गणपती पुढे जाणार? व पुढच्या वर्षी कोणाचा गणपती जाणार? हे ठरले.

लोणी काळभोर येथील खोकलाई चौकात एक मंडळ दोन तास एकाच जागी डीजे वाजवीत होते. यावेळी एकापाठोपाठ अनेक गणपती मंडळांच्या रांगा लागल्या होत्या. यावेळी पोलिसांच्या पथकाने संबंधित मंडळाला खडेबोल सुनावले व मंडळांना रस्ता करून दिला. यावेळी बघ्यांनी मोठी गर्दी केली होती. त्यानंतर पाठीमागचे सर्व गणपती मंडळ पुढे आली आणि त्यांनी आपापल्या बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला. तर शनिवारी अनंत चर्तुदर्शी म्हणजे गणपती विसर्जनाचा शेवटचा दिवस उर्वरित राहिलेल्या सर्व गणपती मंडळांच्या बाप्पाचे विसर्जन झाले आहे.

गणेशोउस्तवादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित होऊ नये, म्हणून लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी ८ पथके तयार केली होती. तसेच आवाजाची रीडिंग घेण्यासाठी एक फिरते पथक तयार केले होते. या पथकाने सर्व मंडळांच्या डीजेचे रीडिंग घेतली असून त्याचा अहवाल कारवाईसाठी पाठविला आहे. तसेच आवाजाची मर्यादा ओलांडणाऱ्यांवर लवकरच कारवाई करण्यात येणार आहे. अशी माहिती पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्याकडून मिळाली आहे.

**गणेशोत्सव दरम्यान कडेकोड बंदोबस्त**

लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कृष्णा बाबर, अंकुश बोराटे, सोमनाथ नाळे, पोलीस उपनिरीक्षक अनिल जाधव, रत्नदीप बिराजदार, सर्जेराव बोबडे,दिगंबर सोनटक्के, सहाय्यक फौजदार रामदास मेमाणे, पोलीस हवालदार वैजिनाथ शेलार, दिगंबर जोगदंड, रामहरी वणवे, गणेश सातपुते, रवी आहेर, मंगेश नानापुरे, सुनील नागलोत, तेजस जगदाळे, तेज भोसले, पोलीस अंमलदार संदीप धुमाळ, मल्हारी ढमढेरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी गणेशोत्सव दरम्यान कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे.

---

प्राईम लाईफ



## शरीरातील वाढते कोलेस्ट्रॉल रोखेल दालचिनी

दालचिनीचा वापर रोजच्या आहारात केल्यास शरीरात वाढलेले कोलेस्ट्रॉल नियंत्रणात येण्यास मदत होते. दालचिनीचे आयुर्वेदात मोठे महत्व आहे. दालचिनी आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरू शकते. दालचिनीमध्ये अनेक औषधी गुणधर्म आढळून येतात. दालचिनीमध्ये आढळणारे सिनामल्डीहाइड आणि सिनामिक ॲसिड खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करते.

**हृदयविकाराचा धोका कमी होतो**

दालचिनीचे नियमित सेवन केल्याने ब्लड सर्क्युलेशन सुधारते आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो. रोजच्या आहारात तुम्ही दालचिनीचा वापर करू शकता. ज्यामध्ये तुम्ही दालचिनीचा वापर चहामध्ये करू शकता. तसेच भाजी बनवताना देखील याचा वापर करता येऊ शकतो. रोज सकाळी रिकाम्या पोटी दालचिनी पावडर आणि गरम पाणी पिऊन तुम्ही शरीरातील कोलेस्ट्रॉल नियंत्रणात आणू शकता. मात्र, दालचिनीचे अतिसेवन तुमच्या आरोग्याचे नुकसानही करू शकते. सोबतच मध आणि दालचिनी तसेच दुधात दालचिनीची पावडर मिसळूनही तुम्ही पिऊ शकता.

जर तुम्ही असा आहार घेतला, ज्यामध्ये सॅच्युरेटेड फॅटचे प्रमाण जास्त असेल तर रक्तातील एलडीएल किंवा खराब कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढते. मांस, दुग्धजन्य पदार्थ, अंडी, खोबरेल तेल, पाम तेल, लोणी, चॉकलेट, तळलेले पदार्थ, प्रक्रिया केलेले पदार्थ आणि बेकरी प्रोडक्ट्स कोलेस्ट्रॉल वाढवू शकतात. त्यामुळे या गोष्टी टाळून तुम्ही स्वतःला खराब कोलेस्ट्रॉलपासून दूर ठेवू शकता.

---

## गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या...

**पान १ वरून**

उरुळी कांचन मधील आश्रम रोड परिसरातील महात्मा गांधी तरुण मंडळ, जय महाराष्ट्र तरुण मंडळ, शिवछत्रपती मित्र मंडळ, गुरुदत्त मित्र मंडळ, बाजार मैदान येथील अनुपम मित्र मंडळ, भोलेनाथ तरुण मंडळ, गूळ आळी येथील श्रीमंत वीर तरुण मंडळ, तुपे वस्ती येथील नवजीवन मित्र मंडळ, महात्मा गांधी रास्ता परिसरातील श्रीकृष्ण मित्र मंडळ, साईनाथ तरुण मंडळ, पोलिस चौकी परिसरातील नवचैतन्य मित्र मंडळ, तळवाडी चौक परिसरातील अखिल तळवाडी मित्र मंडळ, शिंदवणे रोड येथील नव आझाद तरुण मंडळ या महत्त्वाच्या मंडळांप्रमाणेच शिंदवणे येथील शिवछत्रपती तरुण मंडळ, सोरतापवाडी येथील अखिल सोरतापवाडी सार्वजनिक गणेश गावठाण गणेशनगर मित्र मंडळ, चिंतामणी मित्र मंडळ, एकता तरुण मंडळ, शिवतेज मित्र मंडळाने भावपूर्ण वातावरणात गणरायाला निरोप दिला.

दरम्यान, लोणी काळभोर येथील बहुसंख्य गणेश मंडळांनी बाप्पाचे विसर्जन एमआयटीतील मुळा मुठा नदीत केले आहे. विसर्जनाच्या ठिकाणी गर्दी होऊ नये अथवा कुठलीही दुर्घटना होऊ नये. म्हणून खबरदारी घेतली होती. नागरिकांच्या सेवेसाठी पोलीस मित्रांची नेमणूक केली होती. लोणी काळभोर व कदमवाकवस्ती येथील सार्वजनिक गणपतींचे होडीच्या सहाय्याने मुळा मुठा नदीत जाऊन रविवारी (ता.७) पहाटे तीन वाजेपर्यंत विसर्जन करण्यात आले. तर उरुळी कांचन येथील मंडळांनी ग्रामपंचायतीने तयार केलेल्या कृत्रिम हौदात बाप्पाचे विसर्जन करण्यास पसंदी दर्शवली. लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे व उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक गावात विसर्जन स्थळी चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

**जी. एम. ग्रुपचा उपक्रम कौतुकास्पद**

जी. एम. ग्रुपने सामजीक बांधिलकी जपत लोणी काळभोर येथे पर्यावरण वाचवा उपक्रमाअंतर्गत'मूर्तिदान व निर्माल्य दान'हा उपक्रम गेली ८ वर्षा पासून राबवत आहे. लोणीकर याला भरभरून प्रतिसाद देत आहेत. यावर्षी गणेश भक्तांनी २ हजाराच्या आसपास मूर्तीदान केल्या आहे. त्याच बरोबरजी. एम. ग्रुपने 'बेटी बचाव बेटी पढाव',झाडे लावा झाडे जगावा,एक कन्या दाम्पत्य सत्कार,विद्यार्थी चे बौद्धिक कौशल्य वाढी करिता विविध स्पर्धा यासारखी विविध समाजिक उपक्रम राबविले होते. हे उपक्रम शिवाजी जावळे, रंजीत जगताप, सचिन गायकवाड, ओंकार नेवासे, संदीप फुले, अमोल गायकवाड, संतोष भुजभळ, सागर भुजबळ, अक्षय देडगे, महेश गायकवाड, रोहित गायकवाड राबवीत आहेत.

---

## निमगाव केतकीत गणेश विसर्जनात हिंदू-मुस्लिम ऐक्य

### पारंपारिक वाद्य आणि विद्युत रोषणाईत उत्साह

**आदित्य बोराटे**



**इंदापूर, ता. ७ :** 'गणपती बाप्पा मोरया पुढल्या वर्षी लवकर या' गजरात निमगाव केतकी येथील केतकेश्वर गणेश मंडळाच्या मूर्तीचे विसर्जन उत्साहात व शांततेत पार पडले. ईद-ए-मिलाद निमित्त मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सर्व मुस्लिम कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या तर गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत देखील मुस्लिम युवक युवतींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेल्या केतकेश्वर मंडळाच्या मिरवणुकीत मुस्लिम युवक युवतींचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुसूचित प्रकार घडू नये म्हणून मंडळाच्या वतीने फिरती स्क्रीन व चार सीसीटीव्ही लावण्यात आले व त्याचे प्रक्षेपण करण्यात आले.

केतकेश्वर गणेश मंडळ तब्बल १९५२ वर्षांपूर्वी स्थापन झाले. बाबा गोपाल राऊत, ताजुद्दीन शेख, यासीन शेख, काशिनाथ राऊत, उत्तम राऊत, भीमराव बंडगर यांच्यासह युवकांनी एकत्र येत या मंडळाची स्थापना केली. 'हम सब एक है' हा नारा दिला आणि हीच परंपरा आज देखील कायम आहे. मंडळाच्या वतीने लहान मुलांच्या स्पर्धा, महिलांसाठी होम मिनिस्टर, संमोहन तसेच करमणुकीचे विविध कार्यक्रम ठेवण्यात आले होते. आदल्या दिवशी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

मंडळाच्या वतीने विसर्जनासाठी आकर्षक विद्युत रोषणाई तसेच पद्मावती मंदिराचा देखावा करण्यात आला होता. सुहास जाधव,अक्षय चिखले, सचिन मुलाणी, रेहणा मुलाणी, सुनील कुदळे, अतुल होनराव, विकास बंडगर, निहाल शेख, धनेश राऊत, मनोज बंडगर, भावेश राऊत, शाहरुख शेख, जमीर पठाण, हनुमंत काळे, आकाश राऊत, सुमित चिखले, रवी कांबळे, अमित चिखले ओंकार स्वामी, बबलू मुलाणी, प्रथमेश चिखले, बंडू भागवत, रोहित होनराव, शैलेश तांदळकर आदी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी या मिरवणुकीसाठी विशेष परिश्रम घेतले.

केतकेश्वर गणेश मंडळात विसर्जन मिरवणुकीत गुलालाचा वापर न करता झेंडूच्या फुलांची उधळण केली जाते. लहान मुलांना व वृद्धांना होणाऱ्या डिजेच्या दुष्परिणाममुळे पारंपारिक वाद्यांना महत्त्व देऊन कर्नाटक सारवाड या ठिकाणी असणारे बहुरूपी भावल्यांचे आकर्षक नृत्यकाम या मिरवणुकीत सहभागी करण्यात आले होते यामुळे ही मिरवणूक नागरिकांना आकर्षित करत होती.

> **मानवता हाच खरा धर्म देशभरात सध्या जात-पात आणि धर्माच्या नावाने निर्माण होणारे तणा तणावाचे वातावरण लक्षात घेता निमगाव केतकी येथील केतकेश्वर गणेश मंडळ 'हम सब एक है' या भावनेचे मूर्तिमूर्त उदाहरण आहे. गावातील हिंदु मुस्लिम युवक श्रद्धेने या मंडळात व सर्व कार्यक्रमात सहभागी होतात.**
> **- प्रशांत बंडगर,**
> अध्यक्ष केतकेश्वर गणेश मंडळ

---

## गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजेची विजेच्या खांबाला धडक

### करंट लागून दोघे जखमी; उत्सवात खळबळ

**पुणे, ता. ७ :** चिंचवडमधील मोहन नगर येथे गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान विजेच्या तारेचा धक्का लागून दोन तरुण गंभीर जखमी झाले. ही घटना शुक्रवारी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास घडली. जखमींची नावे प्रवीण राजेंद्र कुटे आणि अमोल सदाशिव चव्हाण अशी आहेत.

मोहन नगरमध्ये गणपती बाप्पांची विसर्जन मिरवणूक मोठ्या जल्लोषात सुरू होती. डिजेच्या गाड्यांवर भक्त नाचत होते. भक्तिमय आणि उत्साहाच्या वातावरणात अचानक काली माता मंदिराजवळ डीजेच्या गाडीचा धक्का विजेच्या खांबाला बसला. या धक्क्याने विजेची तार तुटून थेट प्रवीण आणि अमोल यांच्या अंगावर पडली. अचानक झालेल्या या अपघातात करंट लागून दोघेही गंभीर जखमी झाले.

घटनेनंतर प्रवीण आणि अमोल या दोघांना जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळाली आहे. पिंपरी पोलिसांनी तातडीने महावितरण भोसरी येथील कर्मचाऱ्यांना घटनास्थळी बोलावले. तुटलेली तार दुरुस्त करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

या घटनेनंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कडलग यांनी आवाहन केले की "गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान विजेचा खांब, वायर किंवा डीपीजवळ आल्यास गणेश भक्तांनी मिरवणूक शांततेत पुढे न्यावी. तसेच डीजेवर नाचणाऱ्या तरुणांनी सुरक्षिततेसाठी गाड्यांवरून खाली उतरून मिरवणुकीत सहभागी व्हावे."

---

## कदमवाकवस्ती येथे ट्रकची दुचाकीला धडक

### सोरतापवाडीतील विद्यार्थी जखमी; गुन्हा दाखल

**लोणी काळभोर, रा. ७ :** पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर ट्रकने एका दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याची घटना घडली आहे. ही घटना कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील ज्युडीओ समोर आज शनिवारी (ता.६) पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या अपघातात सोरतापवाडीतील विद्यार्थी जखमी झाला आहे.

ऋषीकेश राजेंद्र चौधरी (वय -२५, रा. सोरतापवाडी ता. हवेली जि.पुणे) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. तर याप्रकरणी ट्रकचालक राजेंद्र बाबासाहेब गर्जे (वय ३४, रा. खिळद ता. आष्टी, जि.बीड) याच्यावर लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ऋषीकेश चौधरी हे उच्च शिक्षण घेत असून ते कुटुंबासोबत सोरतापवाडी परिसरात राहतात. चौधरी हे त्यांच्या टी व्ही एस कंपनीची ज्युपीटर गाडीवरून घरी चालले होते. हडपसरकडून सोलापूरच्या दिशेने जात असताना त्यांची दुचाकी ज्युडीओ समोर आली. तेव्हा अशोक लेलंन्ड कंपनीच्या ट्रकने (एम एच ४३ सी के ९७२०) त्याच्या दुचाकीला पाठीमागून धडक दिली. ऋषीकेश चौधरी हे जखमी झाले असून त्यांच्यावर लोणी काळभोर परिसरातील एका रुग्णालयात उपचार सुरु आहे.

ट्रकचालक राजेंद्र गर्जे यांनी वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून बेदरकारपणे, हयगयीने, निष्काळजीपणे ट्रक चालवुन या अपघातास, फिर्यादीच्या दुखापतीस व वाहनांच्या नुकसानीस कारणीभुत ठरला आहे. अशी फिर्याद ऋषीकेश चौधरी यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यानुसार राजेंद्र गर्जे याच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम २८१, १२५(अ), ३२४(४) मोटार वाहन कायदा कलम १८४, १८५,११९/१७७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार केतन धेंडेकरीतआहेत.

---

## कोंढापुरी कवठीमळा गणेशोत्सवात पायी दिंडीची अनोखी झळाळी

**अक्षय टेमगिरे**



शिक्रापूर : शिरूर तालुक्यातील कोंढापुरी कवठीमळा गावाच्या संस्कृतीला आणि परंपरेला अधोरेखित करणारा आगळावेगळा सोहळा कोंढापुरी कवठीमळा येथे अनुभवायला मिळाला. विरसाहेब गणेश मित्र मंडळाच्या पुढाकाराने यंदा विसर्जन मिरवणुकीसाठी पारंपरिक पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

वाद्यांच्या गजरात, टाळ-मृदुंगाच्या ठेक्यात आणि ढोल-ताशांच्या निनादात गाव एकसंघ झाला. लेझीमच्या झंकाराने मिरवणुकीला पारंपरिक रंगत लाभली. आधुनिक वाद्यांचा कोलाहल टाळून भक्तिमय व शिस्तबद्ध वातावरणात पार पडलेली ही मिरवणूक ग्रामस्थांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

लहानांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी उत्साहाने सहभाग घेत महिलांची पारंपरिक वेशभूषा, मुलांचा टाळ-मृदुंगावरील ठेका आणि तरुणांचा शिस्तबद्ध सहभाग हे विसर्जन मिरवणुकीचे खास आकर्षण ठरले. मार्गभर आरत्या, भजन व भक्तिगीतांचा गजर सुरू होता.

विरसाहेब गणेश मित्र मंडळाच्या या उपक्रमाचे पंचक्रोशीत कौतुक होत असून, गावकऱ्यांनी याला "परंपरेशी नाळ जोडणारा आणि पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी उपक्रम" असे संबोधले. ग्रामस्थांनी अपेक्षा व्यक्त केली की, यापुढे इतरही मंडळांनी अशाच पारंपरिक व शिस्तबद्ध पद्धतीने विसर्जन सोहळा साजरा करून गावोगाव सांस्कृतिक वारसा जपावा.

---

## चाकण विसर्जनात दुर्दैवी घटना

### ४ युवक पाण्यात बुडाले; २ मृत, २ बेपत्ता



**चाकण, ता. ७ :** वाकी बुद्रुक, शेलपिंपळगाव येथील भामा नदीत आणि बिरदवडी (ता. खेड) येथील विहिरीत गणपती विसर्जनादरम्यान चार युवक पाण्यात बुडल्याची धक्कादायक माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. यातील दोन जणांचा मृत्यू झाला असून दोन जणांचा शोध अद्याप सुरू आहे. या दुःखद घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

वाकी बुद्रुक येथील प्रियदर्शन शाळेजवळील भामा नदीमध्ये अभिषेक संजय भाकरे (वय २१, रा. कोयाळी, ता. खेड) आणि आनंद जयस्वाल (वय २८, रा. उत्तरप्रदेश) हे दोघे गणपती विसर्जनादरम्यान पाण्यात बुडाले. यातील आनंद जयस्वाल याचा मृतदेह सापडला आहे, तर अभिषेक भाकरे याचा चाकण पोलीस, एनडीआरएफ, अग्निशमन दल आणि रेस्क्यू टीमच्या माध्यमातून शोध सुरू आहे.

तसेच शेलपिंपळगाव (ता. खेड) येथेही अशीच दुर्दैवी घटना घडली. रवींद्र वासुदेव चौधरी (वय ४५, रा. शेलपिंपळगाव) गणपती विसर्जनासाठी नदीत गेले असता ते पाण्यात वाहून गेले. पोलिसांनी ही माहिती दिली आहे. बिरदवडी (ता. खेड) येथे संदेश पोपट निकम (वय ३५, रा. बिरदवडी) यांचा गणेश विसर्जन करताना तोल गेल्याने पाण्यात बुडून मृत्यू झाला. चाकण पोलीस, एनडीआरएफ आणि अग्निशमन दलाने मृतदेह बाहेर काढून पुढील कार्यवाहीसाठी चाकण ग्रामीण रुग्णालयात दाखल केला.

आज संपूर्ण राज्यात गणेशोत्सवाचा उत्साह आणि जल्लोष दिसत असताना चाकण परिसरात मात्र गणेश विसर्जनादरम्यान दोन जणांचा मृत्यू आणि दोन जण बेपत्ता झाल्याने वातावरणात हळहळ पसरली आहे.

पोलिसांनी वारंवार आवाहन करूनही नागरिकांकडून नदीपात्रात उतरून विसर्जन करण्याचा हट्ट केला जातो. भामा नदीसह परिसरातील तलाव, तळी आणि विहिरीत उतरून गणपती विसर्जन करण्याचे धाडस अखेर दोन जणांच्या जिवावर बेतले असून दोन जण अजूनही बेपत्ता आहेत.

---

## गिरगाव चौपाटीवर गणेशोत्सव विसर्जनात जल्लोष; मुख्यमंत्री फडणवीस उपस्थित



**मुंबई, ता. ७ :** राज्य शासनाने यंदा गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव'चा दर्जा दिल्यानंतर प्रथमच साजरा झालेला विसर्जन सोहळा गिरगाव चौपाटीवर मोठ्या जल्लोषात पार पडला. या भव्य सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः उपस्थित राहून गणरायाला निरोप दिला.

मुख्यमंत्र्यांसह विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पर्यटन मंत्री मंगलप्रभात लोढा, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्यमंत्री योगेश कदम, आमदार अमित साटम, मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी आणि अतिरिक्त आयुक्त अमितकुमार सैनी यांची यावेळी उपस्थिती होती. हजारो भाविकांनी "गणपती बाप्पा मोरया"च्या गजरात सहभागी होत विसर्जन मिरवणुकीला रंगत आणली. ढोल-ताशांच्या निनादात चौपाटीवर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या विसर्जनाच्या व्यवस्थेत पोलिस, स्वयंसेवक आणि महापालिका कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. या सर्वांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी विशेष कौतुक केले. "मुंबई, पुणे तसेच राज्यातील सर्व शहरांमध्ये व गावांमध्ये गणेशोत्सव शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडल्याचे समाधान आहे," असे ते म्हणाले.

गणरायाच्या निरोपप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, "दहा दिवस भक्ती आणि उत्साहात साजरा झालेला उत्सव संपताना मनात खंत निर्माण होते, पण याचबरोबर पुढच्या वर्षी बाप्पा पुन्हा येणार याचा आनंदही आहे." राज्य सरकारकडून 'राज्य महोत्सव' म्हणून मान्यता दिलेल्या या उत्सवामुळे सार्वजनिक गणेशोत्सवाची प्रतिष्ठा अधिक वाढली असून, भविष्यातही हा उत्सव अधिक भव्यतेने साजरा होईल, अशी अपेक्षा अनेक मान्यवरांनी व्यक्त केली.